# कार्ल मार्क्स आणि भारताचा इतिहास

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे
एम्. ए. पीएच्. डी.

कार्ल मार्क्सने साऱ्या इतिहासाची वैज्ञानिक मीमांसा केली आहे असा दावा नेहमी सांगण्यात येतो म्हणून मार्क्सने भारताच्या इतिहासाबद्दल जे लिहिले आहे त्यावरून भारताचा इतिहास अधिक चांगल्या रीतीने समजण्यास मदत होते की नाही हे पाहणे उद्बोधक ठरेल. भारताच्या इतिहाससंबंधीचे मार्क्सचे विचार 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून' या पत्रात प्रसिद्ध झाले होते. तसेच एंजल्सशी झालेल्या पत्रव्यवहारातदेखील या विषयाशी संबंधित असा काही मजकूर आढळतो.

### भारताच्या इतिहासाचे मार्क्सप्रणीत सार

मार्क्सने भारताच्या इतिहासाविषयी व्यक्तविलेले विचार थोडक्यात असे आहेत :

'भारताला स्वतःचा इतिहासच नाही. भारतावर स्वारी करून त्यावर राज्य करणाऱ्या आक्रमकांचा इतिहास म्हणजे भारताचा इतिहास... अशाच आक्रमकांपैकी मुघल होते. त्यांची सत्ता त्यांच्या सुभेदारांनी खिळखिळी केली. या सुभेदारांची सत्ता मराठ्यांनी खिळखिळी केली, मराठ्यांची सत्ता अफगाणांनी मोडून काढली व शेवटी ब्रिटिशांनी या सगळ्याचेच उच्चाटण करून आपली सत्ता स्थापित केली.

'भारत हे नेहमीच आक्रमकांचे भक्ष्य राहिले ही गोष्ट यदृच्छेने घडली नाही. भारतीय समाजाची धारणाच अशी होती की तो आक्रमकांच्या भक्ष्यस्थानी पडावा. भारतीय हे नाना जाती, धर्म, टोळ्या यांचे कडबोळे आहेत. आणखी खोलात जाऊन भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला तर भारताच्या दास्याची कारणे अगदी ललाटलेखासारखी तिच्यात लिहिलेली आढळून येतात. फार प्राचीन काळापासून हिंदूंनी धरणयोजनांची जबाबदारी मध्यवर्ती सत्तेवर सोडली होती. उलट, शेती व उद्योगधंदे कोणत्याही मध्यवर्ती नियंत्रणाखाली न ठेवता आपल्या ग्रामव्यवस्थेमध्ये विकेंद्रित केले होते. ही ग्रामव्यवस्था अत्यंत लहान अशा खेड्यांची बनलेली होती. ही खेडी परस्परांहून स्वतंत्र व जवळजवळ स्वायत्त होती. ग्रामातील पाटील हा पोलीस, महसूल व न्यायदानाची कामे करी. कुळकर्णी हा शेतीच्या उत्पन्नाचे हिशेब ठेवी, तोटी हा पिकांची राखण व मोजदाद करी, शाळामास्तर मुलांना लेखनवाचन व हिशेब शिकवी, ब्राह्मण पंचांग व धर्मकृत्ये सांभाळी. हीच प्रथा शतकानुशतके चालू होती. विशिष्ट कामेदेखील शेकडो वर्षांपासून विशिष्ट कुटुंबे करीत आली. ही खेडी होताहोईतो स्वयंपूर्ण असत. खेड्यात होणारा कच्चा माल वापरून खेड्यांतला कारागीर वस्तू तयार करी.

'या स्वायत्त ग्रामसंस्था पहिल्यांदा ब्रिटिशांनी नष्ट केल्या. यासाठी त्यांनी बलप्रयोग केला नाही. खेड्यांतील विणकर व शेतकरी यांचे स्थानिक सहकार्य लॅंकेशायरच्या बाष्पशक्तीने संपुष्टात आणले. भारतातील पुरातन कालापासून चालत आलेली ग्रामव्यवस्था ब्रिटिशांनी नष्ट केली. याबद्दल अश्रू ढाळण्याचे कारण नाही. भारताच्या तोपर्यंतच्या इतिहासात घडलेली ही एकमात्र क्रांती होती. भारताची ग्रामव्यवस्था नष्ट झाली हे चांगलेच झाले कारण ग्रामव्यवस्थेतून खालील दहा भयंकर गोष्टी जन्माला आल्या होत्या : १. पौरस्त्य जुलूमशाही २. लहानशा सीमेत मानवी मनाची कोंडी ३. अंधश्रद्धा ४. परंपरादास्य ५. साऱ्या ऐतिहासिक शक्ती व उदात्तता यांपासून मानवाची वंचना. ६. दैववाद ७. बलीची प्रथा ८. जातिभेद व गुलामगिरी ९. निसर्गपूजा आणि

१०. माकडपूजा ' —मार्क्सच्या न्यायालयाने भारताविरुद्ध दिलेला निर्णय वरीलप्रमाणे आहे.

## अतर्क्य कारणमीमांसा

वरील सर्व वाचून वाचकाला असे वाटण्याचा संभव आहे की मी मार्क्सचे विचार बरोबर मांडले नाहीत. कारण मार्क्सवादी नसलेल्या सर्वसाधारण वाचकाला ते अगम्य वाटतील. त्यामुळे मी मार्क्सचे विचार मांडताना कोणत्याही तऱ्हेचे मिथ्यादर्शन केलेले नाही हे सांगणे आवश्यक आहे. मार्क्सचे जे मुळात विचार आहेत ते सामान्य तर्कशास्त्राला अगम्य असेच आहेत. त्यात 'अ'चे कारण 'ब' का? तर मार्क्स म्हणतो म्हणून यापलीकडे कोणतेच आधार नसतात. 'ग्रामव्यवस्थेची जी दहा महत्पापे मार्क्सने नोंदविली आहेत त्यांचा ग्रामव्यवस्थेशी संबंध काय?' याचे उत्तर 'बादरायणसंबंध' याव्यतिरिक्त दुसरे देता येत नाही. ग्रामव्यवस्था ही ग्रामांची स्वायत्तता व स्वयंपूर्णता यांवर आधारलेली होती. तिच्यापासून पौरस्त्य असो वा पाश्चात्य असो, कोणत्याही प्रकारची जुलूमशाही कशी निर्माण होईल? गावाच्या पाटलाची सत्ता जुलूम करण्याइतकी अनिर्बंध होती काय? त्याची आज्ञा कितीही अन्यायाची असली तरी तिची निमूटपणे अंमलबजावणी करणारे सैनिक त्याच्या हाताशी असत काय? हजारो वर्षांपासून चालत आलेल्या रूढींच्या विरुद्ध जाऊन अरेरावी करणे त्याला शक्य होते काय? की पाटलाचे हुकूम बऱ्या बोलाने पाळावे यापलीकडे कोणतीच रूढी या खेडयांमध्ये नव्हती असे मार्क्सला म्हणायचे आहे?

स्वायत्त व स्वयंपूर्ण ग्रामाच्या पद्धतीमुळे गावातील रहिवाशांचा बाहेरच्या जगाशी संबंध तुटत असे व त्यामुळे मानवी मन एका लहानशा सीमेत बंदिस्त होऊन अंधश्रद्धेचे लक्ष्य बनत असे, असा तर्क करता येईल. पण ज्या काळी घोडागाडीपेक्षा अधिक जलद चालणारे वाहनच नव्हते त्या काळी ग्रामांच्या स्वायत्ततेला दुसरा काही पर्याय इतर जगात तरी होता काय? युरोपातील खेड्यांचा तरी त्या काळी एकमेकांशी व शहरांशी भारतातल्यापेक्षा अधिक संबंध होता काय? प्राचीन काळी भारतापेक्षा युरोपात अंधश्रद्धा कमी होती असे मानण्यास काही आधार आहे काय? आपल्या बायकोला किती दात आहेत हे जाणून घेण्यासाठी, ते मोजायच्या भानगडीत न पडता, युरोपातील विद्वज्जन ॲरिस्टॉटलचे ग्रंथ पालथे घालीत असत. युरोपातील वैज्ञानिकांना पदोपदी अंधश्रद्धांशी कसा झगडा करावा लागला हे सुप्रसिद्ध आहे. 'ऐतिहासिक शक्ती व उदात्तता, हे शब्दप्रयोग संदिग्ध आहेत व त्यावरून त्या चिजा भारतात युरोपाच्या मनाने दुर्मिळ होत्या की काय याचा शोध घेता येत नाही. काही लोक म्हणतील की इतर अनेक संस्कृती नष्ट झाल्या तरी हजारो वर्षे भारतीय संस्कृतीने आपले सातत्य कायम ठेवले हेच तिच्या 'ऐतिहासिक शक्ती'चे व 'उदात्तते'चे प्रमाण आहे. दैववादाचा आरोप तर मार्क्सच्या तोंडी मुळीच शोभत नाही. कारण त्याच्या मते सारा मानवी इतिहास एका विरोधविकासी नियतीने बद्ध आहे. या नियतीवर मानवाची काहीच मात्रा चालत नाही. नरबलीची प्रथा हे भारतीय संस्कृतीचे केवळ वैशिष्ट्य आहे व ते ग्रामव्यवस्थेतून उद्भवले हे म्हणणे तर क्षणभरही टिकणार नाही.

नरबलीही ख्रिस्ती धर्माची कल्पना आहे. स्वतः ईश्वरानेच मानवजातीच्या पापाचे क्षालन करण्यासाठी आपल्या पुत्राला क्रूसावर बळी दिले अशी ख्रिस्ती श्रद्धा आहे.

तीच कुटुंबे शेकडो वर्षेपर्यंत तीच कामे करीत, यातून जातिभेद उद्भवला असणे शक्य आहे, पण गुलामगिरीची संस्था यातून कशी उद्भवेल हे समजत नाही. युद्धात विजयी झालेले हरलेल्यांना गुलाम बनवितात अशी इतिहासाची साक्ष आहे. भारतातील स्वायत्त खेडी कुणावर तरी आक्रमण करून विजयी होत असत व गुलामांचे तांडे आपल्या खेडयात घेऊन येत असत असा इतिहास नाही.

निसर्गपूजा व पशुपूजा यांना ग्रामनिवासामुळे उत्तेजन मिळाले असेल, कारण ग्रामीण लोक निसर्ग व पशुपक्षी यांच्या निकट सानिध्यात राहतात. पण निसर्गपूजा व पशुपूजा यांच्या नावे मार्क्सने ऊर बडवावे एवढे त्यात काय वाईट आहे? निसर्गातील उदात्तता पाहण्याची दृष्टी नसणे हे परिणत मनाचे लक्षण नाही. मार्क्सच्या मते वर्डस्वर्थचे सारे काव्य हा रानटीपणाचा आविष्कार ठरेल. पशुपूजेला नावे ठेवताना मार्क्सने मानवाला 'निसर्गाचा राजा' म्हणून संबोधले आहे. यावरून मार्क्स कोपर्निकसपूर्व काळातील मानवकेंद्रित विचारांनी ग्रासला होता हे स्पष्ट आहे. मानव पशूपेक्षा सर्व बाबतीत श्रेष्ठ आहे काय? त्याला कुत्र्याप्रमाणे केवळ वासाने पाठलाग करता येतो काय? तो मोरासारखा सुंदर आहे काय? माणूस पशूला सहज मारू शकतो, माणसाला मारणे पशूला इतके सोपे नाही यावरून मानव पशूपेक्षा श्रेष्ठ ठरतो असे एक मत प्रचलित आहे. मार्क्सला हे मान्य असल्यास त्याच्या मूल्यकल्पना फारशा उदात्त होत्या असे म्हणवत नाही. जीव घेण्याचे सामर्थ्य हा श्रेष्ठतेचा एकमात्र निकष समजणे खुन्यांच्या समाजाला शोभून दिसेल, सुसंस्कृत मानवाच्या नव्हे. शिवाय मानव सर्वच जीवांना सहज मारू शकतो हे खरेदेखील नाही. पाहता पाहता लक्षावधी मानवांचा प्राण घेणारे असे अनेक जीवाणू आहेत की आपले बुद्धिसर्वस्व वेचूनदेखील मानवाला त्यांना मारण्याचा उपाय सापडलेला नाही. जीव घेण्याचे सामर्थ्य हा श्रेष्ठतेचा निकष मानला तर हे जीवाणू मानवापेक्षा श्रेष्ठ मानावे लागतील.

मार्क्सने रामायण वाचलेले दिसत नाही. नाहीतर 'हनुमानाची ही एका माकडाची पूजा आहे' असे अज्ञानजन्य उद्गार त्याने काढले नसते. असे उद्गार काढण्याच्या आधी रामायणात हनुमानाचे जे चरित्र वर्णिलेले आहे त्याची त्याने चर्चा केली असती.

## ब्रिटिशप्रणीत क्रांतीचे वरदान

ग्रामव्यवस्थेच्या विरुद्ध एकापेक्षा एक भयंकर अशा दहा आरोपांची सुनावणी करून ती नष्ट केल्याबद्दल मार्क्सने ब्रिटिशांना धन्यवाद दिले आहेत. यावरून अशी अपेक्षा निर्माण होते की ब्रिटिशांनी या दहा भयंकर गोष्टींचे कारण नष्ट केल्यावर त्या भयंकर गोष्टीदेखील नष्ट झाल्या असतील. पण असे काही घडले नाही हे कळून येण्यास फार दूर जावे लागत नाही. मार्क्सने ब्रिटिश राज्याची जी माहिती दिली आहे तीवरून हे स्पष्ट होते की ग्रामव्यवस्था नष्ट होऊन ब्रिटिशव्यवस्था सुरू झाल्यावर वरील दहा भयंकर गोष्टी नष्ट होणे तर दूरच राहिले त्या अधिकच भयंकर झाल्या. पौरस्त्य जुलूमशाहीच्या जागी ब्रिटिश जुलूमशाही अस्तित्वात आली. मुघल जुलूमशाही कितीही जालीम असली तरी मुघलांना भारताच्या बाहेर बूड नव्हते. सत्तावनशी तुल्य असा एखादा देशव्यापी उठाव त्यांच्याविरुद्ध झाला असता तर त्यांचे नावनिशाणही भारतात उरले नसते. ब्रिटिशांनी मात्र ब्रिटनमधून मदत मागवून तो उठाव मोडून काढला. ग्रामव्यवस्थेची संकुचित चौकट मोडून ब्रिटिशांनी भारताला आंतरराष्ट्रीय क्षेत्र प्राप्त करून दिले हेही साफ खोटे आहे. ब्रिटिशपूर्व भारत हे एक निर्यातीराष्ट्र होते. म्हणजे आर्थिकदृष्ट्या बाहेरच्या जगात त्याची पत होती. भारताचा हा विदेशव्यापार बुडवून ब्रिटिशांनी भारताचा आर्थिक व्यवहार भारतातच कोंडून ठेवला. यासंबंधीचे आकडे मार्क्सनेच दिले आहेत. १८२४ साली भारतातून सहा कोटी गज मलमल निर्यात होत होती. १८३७ साली ही निर्यात दहा लक्ष गजांवर आली. भारताचा निर्यात व्यापार याप्रमाणे साठ पटीने बुडविल्यामुळे मार्क्सला [illegible] वाटणारी खेडी रोडावली नाहीत; उलट, औद्योगिक क्रांतीचे

ीक समजली गेलेली मोठमोठी शहरेच रोडावू लागली. ब्रिटिश राज्य ापन झाले तेव्हा ढाक्याची लोकसंख्या दीड लक्ष होती. ब्रिटिश ज्याच्या पहिल्या पन्नास वर्षांतच ती वीस हजारांवर आली— मूळ तकात दिलेला आकडा दोन हजारच आहे पण बहुधा एक शून्य ाऱ्याच्या चुकीमुळे गळले असावे. ब्रिटिशपूर्व शासक, जलयोजना आपली खास जबाबदारी समजत असत. ब्रिटिशांनी ही जबाबदारी र नाकारली. शेतसारा घेण्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांशी आपले काही ते नाही असे त्यांचे धोरण होते. म्हणजे ब्रिटिशांनी भारताचा केवळ ापारच बुडविला नाही तर शेतीदेखील बुडविली. ग्रामव्यवस्था नष्ट रून शेती व व्यापार बुडविल्याने 'मानवाला आपल्या ऐतिहासिक वितव्याकडे' नेण्यात ब्रिटिशांनी कोणत्या प्रकारे हातभार लावला मार्क्सने स्पष्ट केले नाही. ग्रामव्यवस्थेने निर्माण केलेल्या बाकीच्या यंकर गोष्टी नष्ट करण्यात ब्रिटिश राज्याने काय यश मिळविले संबंधी मार्क्सने विवेचन केले नाही.

## चुकांचा डोंगर

मार्क्सने भारताच्या इतिहासाची जी रूपरेखा दिली आहे तिच्यात ढकळच ढोबळ चुका आहेत. भारताचा इतिहास हा त्याच्यावर आक्रमण रणाऱ्यांचा इतिहास आहे हा आरोप शाबीत करण्यासाठी मार्क्स ुघलांच्या आक्रमणापासून सुरुवात करतो. जणू मुघल आक्रमणाच्या पूर्वी भारताला इतिहासच नव्हता. दुर्लक्षिलेला काळ सोडला तरी स्वतः निवडलेल्या काळाचा इतिहास सांगताना देखील मार्क्सने घोडचुका केल्या आहेत. मुघलांची सत्ता त्यांच्या सुभेदारांनी मोडून काढली हे खरे नाही. मुघलांची सत्ता मराठ्यांनी मोडून काढली. मराठ्यांना नेस्तनाबूद करण्यासाठी औरंगजेब आपले सारे सामर्थ्य एकवटून जेव्हा त्यांच्या चिमुकल्या राज्यावर स्वारी करून आला तेव्हा त्याच्याशी सतत पंचवीस वर्षे लढा देऊन मराठ्यांनी त्याचा पराभव केला व त्यामुळे मुघलांच्या सार्वभौमतेची इतिश्री झाली.

मार्क्सला वाटते त्याप्रमाणे मराठ्यांची सत्ता अफगाणांनी संपुष्टात आणली नाही. पानिपतची लढाई अहमदशहा अब्दालीने जिंकल्यामुळे अनेकांचा असा समज झाला आहे. पण पानिपतची लढाई हरल्यामुळे मराठ्यांची सत्ता संपुष्टात आली नाही. पानिपतची लढाई १७६१ साली झाली. उलट, मराठी सत्ता १८१८ साली— म्हणजे अर्धशतकापेक्षाही जास्त काळानंतर—संपुष्टात आली. पानिपतच्या आघातानंतर मराठे लवकरच सावरले व त्यांनी भारतातील अफगाणांची ठाणी परत जिंकून घेतली. पुढे शिखांनी खुद्द अहमदशहा अब्दालीचाच पराभव केला

मुघलांच्या अस्तानंतरचा व ब्रिटिशांच्या स्थापनेपूर्वीचा काळ हे एक अराजक होते ही मार्क्सची समजूत महाराष्ट्राबाहेर सर्वत्र आहे व केंब्रिज इतिहासासारखे इतिहास त्याला कारणीभूत आहेत. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर पेशवा बाळाजी विश्वनाथ याने मुघल बादशहाशी एक तह केला. या तहान्वये मुघल बादशहाने आपल्या राजधानीत मराठ्यांची पंधरा हजार फौज स्वतःच्या रक्षणासाठी ठेवण्याचे कबूल केले, आणि

या मोबदल्यात मराठ्यांना चौथ व सरदेशमुखी मुघल मुलखातून वसूल करण्याचा हक्क बहाल केला. पेशव्यांच्या कारकिर्दीचा काळ— म्हणजे साधारणपणे सारेच अठरावे शतक— हा मराठा काळ होता; अराजक नव्हते.

भारताचा इतिहास हा त्यावर झालेल्या आक्रमणांचाच केवळ इतिहास आहे हे मत धादांत असत्य आहे. अलेक्झांडरचे आक्रमण खिस्तपूर्व ३०० च्या सुमारास झाले. त्यानंतर तेराव्या शतकापर्यंत भारताचा बव्हंश भाग भारतीय राजांच्या शासनाखालीच होता. कनिष्कासारखे राजे मुळात भारतीय नसले तरी भारतीय राष्ट्रीयत्वात पूर्णपणे सामावलेले होते.

मार्क्सने आपले लक्ष ब्रिटनच्या इतिहासाकडे वळविले असते तर 'आक्रमकांचा इतिहास' हे वर्णन ब्रिटनला जेवढे लागू होते तेवढे भारताला लागू होत नाही हे त्याच्या लक्षात आले असते. ब्रिटनच्या इतिहासाच्या रंगभूमीवर प्रवेशच मुळी रोमन साम्राज्याचा एक प्रांत म्हणून होतो. जेव्हा खुद्द रोमवरच आक्रमकांच्या धाडी आल्या तेव्हा रोमन लोक ब्रिटन सोडून जाऊ लागले. त्या वेळी 'तुमच्यासारखे मायबाप आम्हाला सोडून गेले तर आमचे रक्षण कोण करील?' म्हणून ब्रिटनचे रहिवासी न जाण्याबद्दल त्यांच्या विनवण्या करू लागले. रोमन साम्राज्यानंतर ब्रिटनवर नॉर्मन, डेन्स, व्हायकिंग्स, इत्यादिकांच्या टोळधाडी आल्या. सध्याचे ब्रिटनचे मुख्य रहिवासी अँग्लो सॅक्सन हेदेखील सॅक्सनीतून आलेल्या आक्रमकांचे वंशज आहेत.

### वदतो व्याघात

ब्रिटिश लष्करी ताब्याने भारतात एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणली, ती घडवून आणण्यात ब्रिटनने अजाणता एक इतिहासदत्त पार भूमिका पाडली असे म्हणणारा मार्क्स १८५७ साली जेव्हा भारताने स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी देशव्यापी उठाव केला तेव्हा आपले तत्त्वज्ञान विसरला व स्वातंत्र्ययुद्ध म्हणून त्याने त्या उठावाचे स्वागत केले.

मार्क्सने ब्रिटिश राज्याचे जे वर्णन केले आहे त्याचे सार असे की या राज्याने भारताला आर्थिक दृष्ट्या देशोधडीस लावले; पण एवढे करून ब्रिटनचा आर्थिक फायदा मात्र काहीच झाला नाही. म्हणजे केवळ विनाशासाठी विनाश असे हे अघोरी कृत्य होते. भारतात ब्रिटिश सैन्य ठेवणे, भारतावर दुसरा कुणी देश स्वारी करू नये म्हणून भारताबाहेरील देशांशी युद्धे करणे वगैरे कामी ब्रिटनला जो खर्च येतो तो भारतातील ब्रिटिशांचे अवाढव्य पगार, विदेशी व्यापार सर्वस्वी आपल्या हातात ठेवल्यामुळे होणारा नफा, इत्यादि मार्गांनी भरून निघत नव्हता. हा हिशेब करताना आपली औद्योगिक क्रांती करण्यासाठी भारतातून जवळजवळ लुटून नेलेल्या कच्च्या मालाची किंमत विचारात घेतली नाही. या मालामुळेच ब्रिटनची औद्योगिक क्रांती शक्य झाली होती. मार्क्सचे सुप्रसिद्ध तत्त्व असे आहे की साम्राज्यवाद हे भांडवलशाहीचे अपत्य आहे. आपला आर्थिक लाभ करून घेण्यासाठीच भांडवलदार साम्राज्ये पसरवीत असतात. भारतावरील ब्रिटिश साम्राज्याचा ब्रिटनला काहीच आर्थिक लाभ नव्हता असे प्रतिपादताना मार्क्सला आपल्या या सिद्धान्ताचा विसर पडलेला दिसतो.

मार्क्सने काहीही म्हटले तरी, अर्थशास्त्रदृष्ट्या हे स्पष्ट आहे की जिंकलेल्या देशाचे शोषण करून जेत्याला कोणताही चिरकालीन आर्थिक लाभ होण्याचा संभव नाही. आपल्या आधिपत्याखाली असलेल्या मुलखाचे शोषण करून त्याला दरिद्री बनविल्याने आपला फायदा होईल असे जेत्याने समजणे म्हणजे आपल्या गायीला उपाशी ठेवल्याने आपला खर्च वाचेल व उपासमारीने ती मेली की उलट तिचे मांस व कातडे विकून आपला आणखीनच फायदा होईल, असे गणित एखाद्या गाईच्या मालकाने करण्यासारखे आहे! गाईला चांगले खाऊपिऊ घातले, आजारात तिच्यावर उपचार केले तर खर्च होतो हे खरे आहे, पण भरपूर दूध व संतती देऊन ती पौष्टिक खाद्य व कामासाठी वृषभशक्ती पुरविते आणि त्या खर्चाची सव्याज फेड करते. तसेच जेत्याने जित राष्ट्राचे शोषण करून त्याला दरिद्री केले तर तो स्वतःच एका कंगाल राष्ट्राचा अधिपती म्हणून कंगाल होण्याच्या मार्गाला लागतो. 'कंगाल राष्ट्राचा अधिपती अधिक समृद्ध की संपन्न राष्ट्राचा अधिपती अधिक समृद्ध?' या प्रश्नाच्या उत्तराबद्दल कुणाला संदेह असण्याचे कारण नाही. भांडवलदार मजुरांचे शोषण करून श्रीमंत होतो व साम्राज्यवादी राष्ट्र जित राष्ट्राचे शोषण करून गब्बर होते, या मार्क्सवादातील कल्पना अर्थशास्त्राच्या धुळाक्षराशीदेखील जुळत नाहीत!

'भारत जेव्हा परकीयांच्या ताब्यात नसे तेव्हा तेथे जितकी खेडी आहेत तितकी राज्ये असत' असे मार्क्सने विधान केले आहे. हीही एक बाजारगप्प आहे. मौर्य साम्राज्य साऱ्या भारतभर पसरलेले होते. ते १३५ वर्षे टिकले. पुढे शुंग राजांनी हे साम्राज्य बळकावून एक शतकभर आपल्या ताब्यात ठेवले होते. भारतीय परंपरेप्रमाणे खिस्ती शकाच्या सुरवातीला उत्तरेत विक्रम व दक्षिणेत शालिवाहन यांची विशाल साम्राज्ये होती. पुढे उत्तरेत गुप्त व दक्षिणेत वाकाटक यांच्या सत्तेखाली सारा भारत होता. ही दोन साम्राज्ये साधारणपणे दोन शतके टिकली

ब्रिटिशांनी साऱ्या भारतावर राज्य केले हे विधान फक्त १८४८ पासून, म्हणजे शिखांचा पराभव, झाल्यापासून तो १९४७ पर्यंत म्हणजे फक्त शंभर वर्षांच्या इतिहासाबद्दल खरे आहे. मुघलांनी साऱ्या भारतावर राज्य केले ही उत्तर भारतात असलेली समजूत तर मुळीच खरी नाही. मुघल राज्य १५२६ साली स्थापले गेले. पण त्याचा विस्तार १५६० नंतर अकबराच्या कारकिर्दीत म्हणजे ३४ वर्षांनी सुरू झाला. हा विस्तार-देखील मुख्यतः उत्तर भारतापुरताच मर्यादित होता. मुघलराज्याचा दक्षिणेत विस्तार करण्याचा प्रयत्न औरंगजेबाने १६८० नंतर म्हणजे तब्बल १२० वर्षांनी सुरू केला. याला प्रयत्न म्हटले आहे कारण त्यात औरंगजेबला यश आले नाही आणि हा प्रयत्न करीत असतानाच त्याचा मृत्यू झाला. तेव्हा औरंगजेबाचे साऱ्या भारतावर राज्य होते असे म्हणणे म्हणजे हिटलरचे साऱ्या युरोपावर राज्य होते असे म्हणण्याइतपतच सत्य आहे !

साऱ्या इतिहासाचा अचूक अन्वयार्थ सांगणारा म्हणून ज्या मार्क्सची किर्ती गाण्यात येते त्याने केलेले इतिहासकथन हा एक असत्य विधानचां डोंगर आहे असे निदान त्याच्या भारतीय इतिहासाच्या विवेचनाबद्दल तरी म्हणणे भाग आहे.

✲ ✲

---

[कोंडी... पान ३५ वरून]

मावशी चिडायची. कधी मुलांनी हट्टीपणा केला म्हणून; कधी ह्यांचे मित्र जास्त वेळ बसले म्हणून, तर कधी मला बँकेतून यायला उशीर झाला म्हणून. जास्त समजावलं तर लगेच म्हणणार, ' मला काय अक्कल शिकवता ! हल्लीच्या पोरी ना तुम्ही ! '

मावशीला काय झालं होतं कोण जाणे ! पण तिचा स्वभाव पार बदलला होता. कुठे एकेकाळची स्वाभिमानी, करारी, मितभाषी स्त्री व कुठे आजची दुबळी, सतत बडबड करणारी मावशी ! पतिनिधनाच्या धक्क्यानं जी डगमगली नाही तिनं म्हातारपणाच्या लहानसहान दुखण्यांनी मोडून जावं ? कदाचित परावलंबी जिणं ह्यापुढे जगावं लागणार, ह्या कल्पनेनं तर मनाचा समतोल ढळला नसावा ?

काहीही असो, मावशीच्या अशा वागण्यानं माझी मात्र तारेवरची कसरत चाल्लीय. तिनं आजवर माझं इतकं केलंय की मी तिला ' माझ्या घरून निघून जा ' असंही म्हणू शकत नाही. मला जेव्हा तिची गरज होती तेव्हा मी हक्कानं तिला ठेवून घेतलं. नि आता तिच्या विकल व असहाय अवस्थेत तिला एकटी टाकून देणं वा ' मंदारकडे जा ' म्हणून सांगणं माणुसकीला धरून होईल काय ? एकदा वाटलं, मंदारला बोलवावं व सांगावं ' बाबारे, काही झालं तरी ती तुझी आईय. तिला सांभाळणं तुझी जबाबदारीय ' पण वाटतं, मंदार काय म्हणेल ? मावशीच्या उपकाराच्या ओझ्याखाली सतत दबलेली मी; असं स्पष्ट बोलणं मला कदापि शक्य होणार नाही. मग मी काय करू ? स्वतःच्या हातानं स्वतःच्या संसाराला चूड लावू ? हे मावशीचं इतकं करतात. पण ती त्यांनाही अद्वातद्वा बोलते, काय बोलतेय, केव्हा बोलतेय ह्याचं तिला भानच रहात नाही. त्यापैकी एखादा शब्द जरी ह्यांनी ऐकला तर ? कल्पनाच नको !

माझ्यावर रागावून हे मुकाट्यानं झोपून गेलेत. दिवसभर हुंदडून दमलेली पोरं केव्हाच झोपेच्या कुशीत विसावलीयत. मी मात्र गॅलरीत तशीच बसून राहिलेय. खडबडीत रस्त्यावरुन बसने लांबचा प्रवास करून आल्यागत माझं अंग आंबून गेलंय. आईच्या जागी असलेली मावशी व जीवनाचा जोडीदार म्हणून निवड-लेला नवरा दोघांची मर्जी सांभाळताना मी मात्र इकडे आड तिकडे विहीर अशा विचित्र कोंडीत सापडलेय. आणि ह्यातून बाहेर पडणं काही केल्या शक्य होत नाहीय. कॉलनीतील एकेका घरातील दिवे विझवले जात आहेत. रविवारच्या विश्रांतीनंतर ताजंतवानं होऊन सहा दिवस काम करण्यासाठी जग उद्या परत उत्साहानं जुंपून घेणार आहे. मी मात्र मरगळलेल्या शरीरानं व त्याहीपेक्षा मरगळलेल्या मनानं विझणारे दिवे मोजत अंधाराकडे पहात तशीच बसून राहिलेय....

☆ ☆ ☆